महाराष्ट्र टाइम्स

१९ फेब्रुवारी २०१५

# येऊरचा होतोय कायापालट

## आदिवासी बांधवांसाठी तरुणांचे प्रयत्न

अनुपमा गुंडे, ठाणे

येऊर म्हटले की समोर येतात तेथील आदिवासी बांधव. शहराला लागून असलेल्या येऊरमधील आदिवासींपर्यंत विकासासाच्या योजना पोहचविण्यात आदिवासी विकास विभाग आणि ठाणे महापालिका या यंत्रणा आजही अपयशी ठरत आहेत. मात्र येथील आदिवासी बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आता तरूणाईनेच सामाजिक संस्थांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू केले आहेत. तरुणांपैकी कुणी शिक्षण, कुणी आरोग्य तर, कुणी रोजगार प्रशिक्षणासाठी प्रयत्न करत असल्याचे आशादायी चित्र सध्या दिसत आहे.

ठाणे महापालिका, वनविभाग आणि आदिवासी विकास विभाग यांच्या त्रांगड्यामुळे येऊरच्या पाड्यावरचे आदिवासी आजही मुलभूत सुविधांपासून वंचित आहेत. शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या या पाड्यांमधील आदिवासींना केवळ सुविधा पुरवून पंगू बनवण्यापेक्षा त्यांच्यात जागृती आणि आत्मविश्वास निर्माण करण्यावर या तरूणांचा भर आहे. याबाबत बोलताना क्रायसिस फाऊंडेशनची अपूर्वा आगवण म्हणाली, येथील आदिवासींचा



मुख्य प्रश्न आहे शिक्षणाचा. मुलांबरोबर मोठ्यांनाही शिक्षणाची गोडी लागावी यासाठी आम्ही येथे प्रौढ साक्षरता वर्ग चालवतो. त्यात २० स्त्रिया येतात. स्त्रिया शिकल्या तर त्या कुटुंबाला सुशिक्षीत बनवतात, आरोग्याची काळजी घेतात. त्यामुळे आम्ही या वर्गातून शिक्षण आणि आरोग्याचे महत्व स्त्रियांच्या मनावर बिंबवत आहोत. येथील मुले अनेकदा सातवीनंतर मार्गदर्शनाअभावी शाळा सोडतात किंवा इंग्रजी, गणित आणि शास्त्र हे विषय त्यांना कठीण जात असल्याने येथील ५० मुलांचा विशेष क्लास घेत असल्याचे अपूर्वाने सांगितले.

यात नॅन्सी डिसूझा, ग्लेम फर्नांडिस सहकार्य करत आहेत. येथील कुपोषण व आरोग्याच्या प्रश्नांवर कमिटेड कम्युनिटी, मॅजिक बस व सेव्ह द चिल्ड्रेन या संस्था एकत्रित काम करत आहेत. स्तनदा माता आणि गरोदर स्त्रियांमध्ये आहारबाबत जागृती करत असल्याचे 'सीसीडीटी'च्या वैजंयती आणि प्रवीण पाचपुते यांनी सांगितले. येथील मुलांना रोजगाराची कौशल्येही शिकवली जातात. ७ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या आहार आणि आरोग्यबाबत जागृतीचे काम या तिन्ही संस्था मिळून करत आहेत.

येऊरमध्ये खासगी आणि पालिकेची अशा दोन शाळा असून, मुलांच्या शाळेच्या गळतीचे प्रमाण अधिक आहे. ते थांबवण्यासाठी, तसेच या शाळांमधील मुलांना शिक्षणाची गोडी लावण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे स्कूल विदाऊट वॉल या संस्थेच्या पंकज गुरव याने सांगितले. यासाठी दर शनिवारी तिथे जाऊन मुलांना सोप्या खेळांतून विविध गोष्टी शिकवत असल्याचे ते म्हणाले. छोटे शब्द तयार करणे, गणिते सोडविणे, त्यांच्यासोबत जंगलात फिरत हसत- खेळत शिक्षण दिले जाते. त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्यासाठी नाटक, गाणी असे उपक्रम गेल्या ६- ७ वर्षांपासून राबवत असल्याचे पंकज म्हणाला.

आमच्या बिनभिंतीच्या शाळेत ही मुले मस्त रमतात, त्यातून त्यांची शिव्या देण्याची सवय कमी होत आहे. ती नियमित शाळेत जाऊ लागली आहेत, असे छोटे- छोटे बदल पंकजने नोंदवले. या उपक्रमांमध्ये शहनाज शेक, महेश बागल, रश्मी पाटील, पूजा भोईर हे तरूणही कार्य करत आहेत.